# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण / ५०५ /२०१४/ २६

तक्रार दाखल दिनांक :- २८.०५.२०१४
निकाल दिनांक :- ३०.०७.२०१४

श्री.रामराव लक्ष्मनराव शिन्दे तक्रारदार
मु.पोस्ट बावनापांगरी
ता.बदनापुर , जिल्हा जालना

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.ग्रामीण मंडळ ,जालना . गैरअर्जदार

मंच सदस्य

श्री. वि. स. काबरा सदस्य
श्री. एस.एस. गऊळकर / सचिव

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २८.०५.२०१४ रोजी जालना मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १७.०६.२०१४ रोजी ठेवण्यात आली.

आमच्या विज पंपाच्या विज पुरवठा करणारे विज रोहीत्र ( ट्रान्सफॉर्मर ) हे ना दुरुस्त ( जळालेले ) झाल्यामुळे व जे की वेळेच्या आत न बदलण्याने झालेल्या नुकसाणीची भरपाई करणेबाबत सदर रोहीत्र हे १२.०९.२०१३ रोजी ना दुरुस्त झाले ( जळाले ) रोहीत्र हे नियमाप्रमाण ४८ तासात बदलुन आमचा

विजपुरवठा सुरळीत व्हावा ही अपेक्षा आहे . मी माझ्या कडे असलेली वीज बिलाची रक्कम भरलेली आहे. परंतु असे असुन सुध्दा मला वेळेवर विज पुरवठा सुरु करुन देण्यात आले नव्हते. त्यामुळे मला नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. करीता अर्ज केलेला आहे

गैरअर्जदार महावितरण यांचे म्हणणे आहे की सदर रोहीत्रावर ३१ ग्राहक आहेत व त्यांच्या कडे रुपये १२,७२,२९५ इतकी रक्कम विज बिलापोटी थकीत आहे , परंतु परिपत्रक क्रमांक १३६ मा. संचालक यांच्या प्रमाणे जर का ८० टक्के ग्राहकांनी थकबाकीची रक्कम भरली नाही तर ना दुरुस्त रोहीत्र हे प्राधान्याने बदलणे गरजेचे नाही . परंतु रु. ४१५९०/- इतके थकबाकीतील रक्कम ही भरण्यात आली ज्यामुळे आम्ही हे प्राधान्यक्रम डावलुन आपली जळालेली / ना दुरुस्त रोहीत्र हे २८.१०.२०१३ रोजी बदलुन विज पुरवठा सुरळीत करुन दिली.

नियमाप्रमाणे हे रोहीत्र बदलणे गरजेचे होते परंतु थकबाकीमुळे व त्यातील अटीनुसार तेवढी थकबाकी ही भरल्यानंतरच रोहीत्र बदलणे असे असतांना सुध्दा आमच्या खात्याने हे रोहीत्र थोडीफार रक्कम थकबाकीतुन वसुल झाल्यामुळे बदलुन दिले आहे.

दोन्ही बाजुंची माहिती ऐकुन घेतल्यानंतर असे लक्षात येते की, नियमाप्रमाणे जो कोणी सर्व थकबाकी चालु बिल वगैरे भरतो त्यांच्यावर हा अन्याय होतो परंतु संपूर्ण परिस्थितीचा विचार केला असता संपूर्ण थकबाकी ही न भरल्यामुळे व त्यातील काही थकबाकी ही वसुल झाल्यामुळे रोहीत्र बदलण्यात आले. यासाठी सर्वाची मानसिकता ही विज बिल भरणे ही झाली पाहिजे जेणेकरुन नियमाचे उल्लघन होणार नाही व नेहमी पैसे भरणा-यांना त्रास होणार नाही हे पहाणे गरजेचे आहे

<u>आदेश</u>

१ ) सदर नुकसान भरपाईचा अर्ज हा रदद करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| . वि. स. काबरा | . एस.एस.गऊळकर |
| सदस्य | सदस्य/सचिव |